याचा :- १) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५चे कलम ३०.३३.३४.४१ व ५१

२) साथ रोग अधिनियम १८९७

३) मा. प्रधान सचिव, मदत व पुनवर्सन, महसुल व वने, मंत्रालय, यांचेकडील पत्र दि.५ फेब्रुवारी २०२०

४) मा. भारत सरकार गृह मंत्रालय यांचेकडील पत्र क्र. १३७/२०१८/FTS१०५४८. दि.०४/०२/२०२०

५) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आयोग्य विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. करोना२०२० प्र. क्र. ५८/ आयोग्य- ५ दिनांक १८ मार्च २०२०

६) मा. आयुक्त पुणे महानगर पालिका व आयुक्त, पिंपरी चिंचचयड महानगर पालिका यांनी करोना प्रतिबंधक अपाययोजना संदर्भात तयार केलेला ( Containment Plan ) आराखडा

७) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाकारी कार्यालय पुणे क्र. जि. आ. व्य/ कोरोना / विषाणु/ १८०/२०२० दि. २५/०३/२०२०

---

आपत्ती तात्काळ

तहसिलदार कार्यालय हवेली, पुणे
९३१, शुक्रयार पेठ, खडकमाळ आळी,
जा क्र. ने. आ./ ८५ /२०२०
पुणे - २ दिनांक ३०/०३/२०२०

**अधिग्रहण आदेश,**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा- २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी, आंतराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना विषाणु संसर्ग बाधित रुग्न आढळत आहे. तसेच आंतराष्ट्रीय व देशातंर्गत विमान प्रवासाव्दारे आलेल्या प्रवाशाव्दारे याचा संसर्ग होत आहे. कोरोना विषाणुचे संशयित रुग्न पुणे जिल्हयात आढळुन आल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्ता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंशण करणे व विषाणुच्या संसर्गात अधिक वाढ होऊ न देता तात्काळ उपाय योजना आखणे आवश्यक आहे. सदर संशयत रुग्णामुळे आपत्तीजनक परिस्थिती उदभवु नये यासाठी पुर्वतयारी करणे अगत्याचे आहे.

ज्या अर्थी पुणे जिल्हयात आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ तसेच साथ आधिनियम १९८७ लागु केला आहे. व त्यासाठी श्री. सुनिल कोळी Assi Incident Commander म्हणुन तहसिलदार हवेली,(पुणे) माझी ग्रामीण हवेलीसाठी नेमणुक केली आहे.

त्या अर्थी पुणे जिल्हायामध्ये परदेशी प्रवासी, त्यांचे अतिजोखमीचे संपर्क व्यक्ती, वयोवृध्द व्यक्ती रोग प्रतिकारक शक्ती कामी झाल्याचे संभाव्य धोका असणा-या व्यक्ती इत्यादी प्रकारचे व्यक्तींना क्वॉरेनटाईन

TRUE COPY ATTESTED

आयुर्वेद महाविद्यालय वाघोली
आ.क्र. २०/०४४
दिनांक. 31/03/2020
ता. हवेली, जि. पुणे

PRINCIPAL
Dr. A. B. Kulkarni
B.S.D.T'S Ayurved Mahavidyalaya
Wagholi, Tal-Haveli, Dist-Pune

Scanned by CamScanner

कक्षामध्ये वैद्यकीय अधिकारी अधिकारी यांचे देखरेखी खाली ठेवण्यात येणार असुन सदर बाब बंधनकारक करण्यात आली आहे.

त्या अर्थी मी सुनिल कोळी Assi Incident Commander तथा तहसिलदार हवेली (पुणे) मला प्राप्त अधिकाराच्या अनुषंगाने खाली नमुद केलेली इमारत अधिग्रहण करण्यात आदेश देत आहे.

४. ईमारत व सोसायटीचा पत्ता:- भारतीय संस्कृती आयुर्वेदिक कॉलेज, वाघोली

५. अधिग्रहणाचा कालावधी :- आज दि. ३०/०३/२०२० पासुन ते पुढील आदेश होईपर्यंत.

६. अधिग्रहण केलेल्या इमारतीचे क्षेत्रफळ :- ५,००० चौ. फु.

सदरची इमारत चांगल्या परिस्थितीत व इमारतीच्या देखभाली करीता आवश्यक सर्व मनुष्यबळ सोय सुविधासह तात्काळ हस्तांतरीत करण्यात यावी. सदर आदेशाची तात्काळ अमंलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेशाची अमंलबजावणी करण्यास विलंब / टाळाटाळ/ नकार दिलेस तसेच आदेशांचे उल्लंघन केलेस भारतीय दंड संहिता मधील कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये शिक्षेस/गुन्हा दाखल करण्यास पात्र राहील.

सदरचा आदेश माझ्या सही व शिक्याने दिला असे.

तालुका कार्यकारी दंडाधिकारी ता. हवेली, (पुणे)

(सुनिल कोळी)
Assi Incident Commander
तथा तहसिलदार हवेली (पुणे)

प्रति,

प्राचार्य,

भारतीय संस्कृती आयुर्वेदिक कॉलेज, वाघोली

ता. हवेली, जि. पुणे

प्रत :- श्री. ------------------------------------------------ समन्वय अधिकारी व नियंत्रण अधिकारी

२/- सदर आदेशाची तात्काळ अमंलबजायणी करुन उक्त नमुद केलेल्या इमारतीचा ताबा तात्काळ घेण्यात यावा व पुढील कार्यवाही करावी.

TRUE COPY ATTESTED

PRINCIPAL
Dr. A. B. Kulkarni
B.S.D.T'S Ayurved Mahavidyalaya
Wagholi, Tal-Haveli, Dist-Pune

Scanned by CamScanner